# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्रं. 236/2023  दिनांक : 18.06.2023

## 1)जबरी चोरी :-

**वजिराबाद** :- दिनांक 16.06.2023 रोजी 23.50 वा. चे सुमारास, **हिंगोली गेट च्या पुलाखाली, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे घरी जात असताना वाटेत चार अनोळखी आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस खंजरचा धाक दाखवून फिर्यादीजवळील विवो कंपनीचा मोबाईल किंमती 13,500/-रूपयाचा व नगदी 1000/- रूपये असा एकुण 14,500/-रूपयाचा मुद्देमाल बळजबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी राहूल पि. साहेबराव मेटकर वय 21 वर्षे, व्यवसाय मुर्तिकार रा. वडार गल्ली, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 222/2023 कलम 394,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जयश्री गिरे, मो.क्रं. 8411835457** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :-

**अर्धापूर** :- दिनांक 14.06.2023 रोजी 23.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरा समोर कामठा बु. ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो सी.डी. डिलक्स कंपनीची मो.सा. क्रमांक एमएच-26/एई-5584 किंमती 25,000/- रूपयाची नमुद ठिकाणा वरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मारोती आनंदराव कल्याणकर, वय 35 वर्षे, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. कामठा बु. ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 195/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1046 बोईनवाड, मो. क्रं. 9881791038** हे करीत आहेत.

## 3)अवैध रेती चोरी :-

**1)कुंडलवाडी** :- दिनांक 17.06.2023 रोजी 07.30 वा. चे सुमारास, **बसस्थानक कुंडलवाडी जवळ नागणीकमान समोर कुंडलवाडी ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिरीत्या ट्रॅक्टर क्रं. टी. एस.-01-इसी-6378 ज्यात लाल रेती किंमती 4000/-रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला व फिर्यादीस पाहुन ट्रॅक्टर सोडुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1209 गणपत कोंडीबा गंधकवाड, ने. पोस्टे कुंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 76/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1921 कदम, मो. क्रं. 8007753455** हे करीत आहेत.

**2)उमरी** :- दिनांक 17.06.2023 रोजी 05.45 वा. चे सुमारास, **गोदावरी नदी पात्रात महाटी शिवार, ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिरीत्या ट्रॅक्टर नंबर नसलेला पाठीमागील भागात ज्याला हेलपाटा लावून अवैधरित्या वाळू/रेती उपसा करण्याचा प्रयत्न करीत असताना ट्रॅक्टर व रेती ज्याची किंमत एकुण 2,50,000/-रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक/उपसा करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मुक्तीराम नागनाथ चेवले, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 157/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कऱ्हे, मो. क्रं. 9923104521** हे करीत आहेत.

## 4)चोरी :-

**उमरी** :-दिनांक 16.06.2023 रोजी ते दिनांक 17.06.2023 रोजी चे दरम्यान, **फिर्यादीचे शेतातील विहीरीवर मौजे तळेगाव शिवार, ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातील विहीरीवरील वायर 125 फुट वायर किंमती 10,000/-रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मोहनराव बाळासाहेब देशमुख, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. तळेगाव ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 155/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2354 गेडाम, मो.क्रं. 9923104521** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :-

**भाग्यनगर** :-दिनांक 16.06.2023 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **देवकुपा मंगल कार्यालय जवळील पानपट्टी जवळ, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीहा फिर्यादीचा भाचा असुन आरोपीने तुझ्या मुली सोबत लग्न का लावून देत नाहीस म्हणुन शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाणव करून खाली पाडुन खांद्यावर लाथांनी मारून खांद्या फॅक्चर करून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सिध्दार्थ लिंबाजी खाडे, वय 35 वर्षे, व्यवसाय मिस्त्री रा. लोकमित्रनगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 227/2023 कलम 325,324,323,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2309 जाधव, मो. नं. 9049343095** हे करीत आहेत.

## 6)शासकीय कामात अडथळा :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 17.06.2023 रोजी 13.00 वा. सुमारास, **बाभुळगाव खडकपुरा तांडा, नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा आरोपींचे घराचे थकीत विजबिल बाकी असल्याने ते वसुल करण्यासाठी गेला असता यातील आरोपीने मेन तारावर आकोडा टाकुन विज चोरी घेतलेली दिसल्याने फिर्यादीने आकोडयाचा व मिटरचा फोटो काढुन घेतला असता यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस फोटो का काढलास म्हणुन शिवीगाळ करून थापडा बुक्याने मारहाण केली व दगड घेवून फिर्यादीचे डावे हाताचे तळहातावर मारल्याने मुक्का मार लागला व लाकडाचे दांडयाने मारून मुक्का मार दिला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी नामदेव मुंजा मुंडे, वय 38 वर्ष व्यवसाय नौकरी वरिष्ठ तंत्रज्ञ महावितरण शाखा कार्यालय एस.आर.टी. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 426/2023 कलम 353,323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2168 शेख जावेद, मो.क्रं. 8999978576** हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :–

**शिवाजीनगर** :– दिनांक 23.08.2023 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **यशंतनगर, नांदेड येथे**, यातील नमुद नऊ आरोपीतांनी कट रचुन स्वताचे आर्थीक लाभासाठी फिर्यादीचा विश्वास संपादन करून फिर्यादीचे आडत दुकानातुन तीन ट्रक मध्ये 66 टन चना प्रति क्विंटल 5050/–रूपये दराने शिवतेज ट्रेडर्स उदगीर यांना विक्री करतो म्हणुन विश्वासाने भरून घेऊन गेला परंतु सदर चना हा शिवतेज ट्रेडर्स उदगीर यांना न विकता चना हा इतर ठिकाणी विकुन त्याचे पैसे फिर्यादीस आज पर्यंत न देता फिर्यादीची 33,44,614/–रूपयाचा अपहार करून आर्थीक फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी श्रीनिवास सुर्यकांत चक्रवार, वय 46 वर्षे, व्यवसाय आडत व्यापार रा. मार्केट यार्ड धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 132/2023 कलम 420, 406, 120(ब), 407, 409 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वाडेकर, मो.नं. 9067081223** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

विमानतळ :– दिनांक 17.06.2023 रोजी 16.40 वा. चे सुमारास, सखोजीनगर, नांदेड येथे, यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व मोबाईल असा एकुण 17,910/– रूपयाचे मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे फिर्यादी पोहेकॉ/2135 सखाराम व्यकंटराव नवघरे, ने. पोस्टे स्थागुशा यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे विमानतळ गुरनं. 200/2023 कलम 12 (अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ/2268 धुळगुंडे, मो.क्रं. 8805647079 हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :–

मुखेड :– दिनांक 17.06.2023 रोजी 21.15 वा. चे सुमारास, पांडुर्णी रोडवरील मोतीनाला येथे ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील नमुद दाने आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3290/–रुपयाचा माल मोटार सायकल क्रं. एम.एच./26–बी.एफ.–4556 किंमती 20,000/–रूपयाची वर चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने घेवून जात असतांना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे फिर्यादी पोउपनि/श्री गजानन विजय अन्सापुरे, ने. पोस्टे मुखेड यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पोस्टे मुखेड गुरनं 188/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पाहेकॉ/2352 गोंन्टे, मो.नं. 9324546300 हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 237 / 2023 दिनांक : 18.06.2023

## मा. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी केले सहकुटूंब श्रमदान व वृक्षारोपण

दिनांक 18.06.2023 रोजी रविवारी **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी पोलीस मुख्यालय, नांदेड येथे सह कुटूंब व नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे सह श्रमदान करून परीसर स्वच्छ केला व मैदानात झांडाचे रोपांची लागवड करून वृक्षारोपन केले. यावेळी **श्री विजय धोंडगे,** राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, नांदेड हे हजर होते तसेच पोलीस मुख्यालय येथील कवायत शिक्षक शेरखॉ पठाण, अनिल शिंदे, सिमा बच्चेवार, शिवाजी पवार, रमेश कांबळे यांनी तसेच नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांनी श्रमदान व वृक्षारोपन करणेसाठी सहभाग नोंदवला होता.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड

